॥ विद्या सर्वस्य भूषणम् ॥

Warana University

# WARANA UNIVERSITY

A STATE PUBLIC UNIVERSITY

Established under Section 3 (6) of MPUA 2016

A/P Warananagar, Tal: Panhala, Dist: Kolhapur, MH, INDIA 416 113 | +1800 599 2328 | www.waranauniversity.org


परिपत्रक क्रमांक: वा.वी/प.भ./37 दिनांक: जून १२, २०२६

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व घटक महाविद्यालये,**
**वारणा विद्यापीठ, वारणानगर.**

**विषय : दिव्यांग (PwD) विद्यार्थ्यांसाठी परीक्षेदरम्यान उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत.**

महोदय / महोदया,

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील **ठराव क्र.** ५ अन्वये व शासन तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिव्यांग (PwD) विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान सुलभता व समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी वारणा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने खालील सुविधा उपलब्ध करून देण्यास तत्त्वतः मान्यता दिली आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सवलती व सुविधा देण्यात येतील :

1. **अतिरिक्त वेळ :** प्रत्येक तासासाठी 20 मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.
2. **लेखक (Scribe) सुविधा :** लेखन अक्षम्यता किंवा दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांना लेखकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. लेखक हा संबंधित विद्यार्थ्यापेक्षा कनिष्ठ शैक्षणिक पात्रतेचा असावा.
3. **स्वतंत्र बैठक व्यवस्था :** दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सोयीस्कर बैठक व्यवस्था करण्यात यावी.
4. **सहाय्यक साधनांचा वापर :** विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आवश्यक सहाय्यक साधनांचा वापर करण्यास परवानगी राहील.
5. **अर्ज प्रक्रिया :** संबंधित विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी विहित नमुन्यात अर्ज सादर करून त्यासोबत वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

सर्व महाविद्यालयांनी आपल्या संस्थेतील पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती संकलित करून वरील सुविधांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. विद्यार्थ्यांच्या अपंगत्वाच्या प्रकार व गरजेनुसार सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

Myadhw.

वारणा विद्यापीठ ता.पन्हाळा जि.कोल्हापूर पिन-४१६११३ वारणानगर

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
**वारणा विद्यापीठ, वारणानगर**

# परीक्षा व मूल्यमापन विभाग

# Standard Operating Procedure (SOP)

# दिव्यांग (PwD) विद्यार्थ्यांसाठी परीक्षा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

१. उद्दिष्ट

दिव्यांग (Persons with Disabilities - PwD) विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान सुलभता, समान संधी व न्याय्य मूल्यमापन मिळावे यासाठी शासन, विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व इतर सक्षम प्राधिकरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे.

२. व्याप्ती

ही SOP वारणा विद्यापीठ व त्याच्या सर्व संलग्न महाविद्यालयांमधील पदवी, पदव्युत्तर व संशोधन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

३. पात्रता

खालील प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या SOP अंतर्गत सुविधा लागू राहतील :

- ✓ दृष्टिदोष / अंधत्व
- ✓ श्रवणदोष
- ✓ हालचालीतील अडचणी (Locomotor Disability)
- ✓ सेरेब्रल पाल्सी
- ✓ विशिष्ट अध्ययन अक्षमता (Specific Learning Disability)
- ✓ लेखन अक्षम्यता (Writing Disability)
- ✓ शासनाने मान्य केलेले इतर दिव्यांगत्व
- ✓ विद्यार्थ्याकडे सक्षम प्राधिकरणाने (As per Govt. GR) जारी केलेले वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

४. उपलब्ध सुविधा

*४.१ अतिरिक्त वेळ*

- ✓ प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल. (उदा: तीन तासांच्या लेखी परीक्षेसाठी एकूण ६० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल)

*४.२ लेखक (Scribe) सुविधा*

- ✓ लेखन अक्षम्यता किंवा दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांना लेखकाची सुविधा उपलब्ध राहील.
- ✓ लेखक हा संबंधित विद्यार्थ्यापेक्षा कनिष्ठ शैक्षणिक पात्रतेचा असावा.
- ✓ लेखकाची माहिती परीक्षा विभागाकडे पूर्वमान्यतेसाठी १५ दिवस अगोदर सादर करणे आवश्यक राहील.

*४.३ स्वतंत्र बैठक व्यवस्था*

- ✓ आवश्यक असल्यास भूतलावरील परीक्षा कक्षाची व्यवस्था करण्यात येईल.

*४.४ सहाय्यक साधनांचा वापर*

- ✓ श्रवणयंत्र, व्हीलचेअर, वाचन सहाय्यक उपकरणे, स्क्रीन रीडर इत्यादी सहाय्यक साधनांचा वापर करण्यास परवानगी राहील.
- ✓ वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती पूर्वसूचनेद्वारे १५ दिवस अगोदर परीक्षा विभागास देणे आवश्यक राहील.

**५. अर्ज प्रक्रिया**

- ✓ विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जासोबत किंवा परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान १५ दिवस अगोदर सुविधा मिळण्यासाठी अर्ज करावा.
- ✓ अर्जासोबत वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
- ✓ लेखक सुविधा आवश्यक असल्यास स्वतंत्र अर्ज सादर करावा.
- ✓ संबंधित महाविद्यालयाने अर्जांची पडताळणी करून परीक्षा विभागाकडे शिफारस करावी.

**६. महाविद्यालय व परीक्षा केंद्राच्या जबाबदाऱ्या**

- ✓ पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करणे.
- ✓ आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देणे.
- ✓ गरज असलेस स्वतंत्र बैठक व्यवस्था सुनिश्चित करणे.
- ✓ लेखक नियुक्ती व पडताळणी प्रक्रिया पूर्ण करणे.
- ✓ SOP ची काटेकोर अंमलबजावणी करणे.

**७. परीक्षा विभागाच्या जबाबदाऱ्या**

- ✓ प्राप्त अर्जांची छाननी व मंजुरी.
- ✓ सुविधा उपलब्धतेबाबत परीक्षा केंद्रांना पूर्व सूचना देणे.
- ✓ आवश्यकतेनुसार विशेष व्यवस्था करणे.
- ✓ अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे.

**८. गैरवापर प्रतिबंध**

- ✓ चुकीची माहिती अथवा बनावट प्रमाणपत्र सादर केल्यास सुविधा रद्द करण्यात येतील.
- ✓ आवश्यक असल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

वारणा विद्यापीठ ता.पन्हाळा जि.कोल्हापूर पिन-४१६११३ वारणानगर

MYadhw.

संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

**वारणा विद्यापीठ, वारणानगर**